श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जानेवारी २०२३ | वर्ष – ११, अंक – १ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## डेरवण रुग्णालयाला मान्यवरांच्या भेटी



*डावीकडून – रीमा शाह, करिश्मा पारेख, असिफ पोरबंदरवाला, श्री. विकास वालावलकर, श्री. निकुंज, डॉ. नेताजी पाटील, डॉ सुवर्णा पाटील*

रोटरी क्लब मुंबई, क्वीन्स नेकलेस चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य श्री. निकुंज, श्रीमती रीमा शाह, श्रीमती करिश्मा पारेख तसेच डॉ. श्रीपाद बाणावली (Director, Academics, टाटा मेमोरियल हॉस्पिटल (TMC), डॉ. प्रतिभा पाटील, टाटा मेमोरियल हॉस्पिटल (प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी विभाग) मुंबई, आदी मान्यवरांनी दि. १६ डिसेंबर २०२२ रोजी भ. क. ल. वालावलकर हॉस्पिटलला भेट दिली.




*डावीकडून – डॉ. सुवर्णा पाटील, श्री. रूप नारायण आणि श्री. कृष्णा महाडिक*

श्री. कृष्णा महाडिक (नाना पालकर स्मृती समितीचे ज्येष्ठ सदस्य) आणि श्री. रूप नारायण (फ्रेट विंग्स सी, वरिष्ठ जनरल मॅनेजर), यांनी शनिवारी दि. ३१ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली.

# प्रा. के. व्ही. व्यंकटेश यांची वालावलकर रुग्णालयाला भेट



*डावीकडून - ओम्‌कार, डॉ. सुहास, प्रा. के. व्ही. व्यंकटेश, डॉ. सुवर्णा पाटील, ज्योती अय्यर, चारू जोगळेकर, पल्लवी भट*



*किशोरवयीन मुलींच्या कोहार्टला भेट आणि मार्गदर्शन*

प्रा. के. व्ही. व्यंकटेश, रासायनिक अभियांत्रिकी विभाग, आय. आय.टी. मुंबई आणि डॉ. सुहास झांबरे (फूड इंजिनीअरिंग) यांनी वालावलकर रुग्णालयात दि. १७ ते १९ नोंव्हेबर २०२२ या काळात किशोरवयीन मुलींच्या कोहार्टला भेट दिली आणि मार्गदर्शन केले. प्रा. व्यंकटेश ह्यांनी 'सिस्टिम बायॉलॉजी मॉडेल'चा वापर करून संशोधन कसे करता येईल ह्याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. सुहास यांनी कोहार्ट डेटाच्या आधारावर किशोरवयीन मुलींना कोणत्या प्रकारचे पौष्टिक घटक वापरून त्यांचा आहार सुधारता येईल ह्याची चाचपणी केली. त्याचबरोबर प्रा. व्यंकटेश यांनी 'फिजिऑलॉजी सिस्टिम - अभियांत्रिकी दृष्टिकोन' या विषयावर वैद्यकीय विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना दि. १९ नोंव्हेबर २०२२ रोजी व्याख्यान दिले.

# कॅन्सर रजिस्ट्री कार्यशाळा



कॅन्सर उपचार करण्यात वालावलकर रुग्णालय कायमच अग्रेसर आहे. त्याचेच पुढचे पाऊल म्हणून आता हॉस्पिटल कॅन्सर रजिस्ट्रीच्या अंतर्गत 'न्युक्लिअर मेडिसिन'ची स्थापना करण्यात येत आहे. ह्याचा फायदा कोकणातील कॅन्सरचे प्रमाण, दिले जाणारे उपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे फायदे यांचे मूल्यांकन करण्यासाठी होणार आहे. कॅन्सर रजिस्ट्री कार्यशाळा, टाटा मेमोरियल ACTREC केंद्र, नवी मुंबई, एपिडेमिऑलॉजी सेंटरमध्ये ३१ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२२ या काळात आयोजित करण्यात आली होती. हॉस्पिटल बेस कॅन्सर रजिस्ट्री (HBCR) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी भ. क. ल. वालावलकर रुग्णालयातून सौ. रुचिरा नांदोस्कर, सौ. मानसी कुलकर्णी, सौ. सान्वी अडूरकर यांनी या कार्यशाळात प्रशिक्षण घेतले. श्री. अतुल बुदुख, यांची इन चार्ज, इन कॅन्सर रजिस्ट्री (टाटा मेमोरियल, ACTREC) या कार्यशाळेसाठी मोलाची मदत झाली.

# डॉ. शिरीष गणेश लिमये यांची कार्यशाळा



व्याख्यान देताना डॉ. शिरीष गणेश लिमये



वैद्यकीय विद्यार्थी, नर्सेस, व इतर कर्मचारी

मुलांच्या संवादकौशल्यमध्ये वृद्धी व्हावी आणि व्यक्तिमत्त्व विकास व्हावा म्हणून डॉ. शिरीष गणेश लिमये यांनी दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी भ. क. ल. वालावलकर रुग्णालय आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात एक कार्यशाळा घेतली. त्या कार्यशाळाला वैद्यकीय विद्यार्थी, परिचारिका, शिकाऊ डॉक्टर्स व इतर कर्मचारी अशा जवळजवळ २०० जणांनी सहभाग घेतला. डॉ. शिरीष गणेश लिमये यांचे शिक्षण एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी. असून ते लेखाशास्त्र विभागाचे प्राध्यापक व प्रमुख म्हणून सिम्बॉयोसिस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, पुणे, येथून ऑगस्ट २०२० मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांना वाणिज्य विषय शिकवण्याचा ३७ वर्षांचा अनुभव आहे.

# जागतिक रेडिऑलॉजी दिवस भ. क. ल. वालावलकर रुग्णालयात साजरा



दि. ८ नोव्हेंबर २०२२ रोजी वालावलकर रुग्णालयात ‘इंटरनॅशनल रेडिऑलॉजी दिवस’ साजरा करण्यात आला. रेडिओलॉजीच्या मूल्यांविषयी जागरूकता वाढविण्यासाठी, रुग्णांच्या सेवेमध्ये सुरक्षितता देण्यासाठी आणि आरोग्य सेवेमध्ये रेडिओलॉजिस्ट आणि रेडिओग्राफरच्या महत्त्वाच्या भूमिकेबद्दल लोकांमध्ये सतत जागृती करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. रांगोळी व पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमास रेडिओलॉजी डॉक्टर्स, स्टाफ व इतर कर्मचारी उपस्थिती होते.

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी चार दिवसांची कार्यशाळा



*बसलेले डावीकडून - डॉ. अमर देशपांडे (Oncoplastic Breast Surgeon, UK), डॉ. संजीव पाटणकर, डॉ. आनंद जोशी*




*डॉ. संजीव पाटणकर आणि एम. बी. बी. एस. विद्यार्थी*

दि. ९ ते १४ डिसेंबर २२ दरम्यान M. D. ( Medicine) आणि M. S. (Surgery) शिक्षण घेणाऱ्या वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रॉयल कॉलेज, एडिनबरा आणि सध्या अमेरिकेत प्रिन्सटन येथे स्थायिक असणारे डॉक्टर संजीव पाटणकर आणि हिंदुजा हॉस्पिटलमध्ये प्रदीर्घ सेवा देणारे डॉक्टर आनंद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ४ दिवसांची कार्यशाळा पार पडली. त्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शल्य कौशल्य आणि वैद्यकीय शिक्षणातील नैतिकता व व्यावसायिकता ह्या विषयांवरही मार्गदर्शन केले गेले. पदव्युत्तर विद्यार्थांनी अवघड केसेस सादर करून आधुनिक रोगनिदान व उपचार पद्धती जाणून घेतल्या. तसेच या केसेस परीक्षेत कशा मांडायच्या याचेही सुंदर मार्गदर्शन विद्यार्थांना मिळाले. कार्यशाळा अधिक परिपूर्ण करण्यासाठी सेंट पीटर हॉस्पिटल, अमेरिका येथील Dr. Capecomorin Pichumoni ह्यांच्याशी स्वादुपिंड आजारावरील आधुनिक उपचारपद्धतीबद्दल संवाद साधून मार्गदर्शन घेता आले. नवीन पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी पुढील संशोधनासाठी ५ नवीन विषयांबद्दल चर्चा झाली. असे आधुनिक विषय संशोधनासाठी निवडल्याबद्दल डॉक्टर पाटणकर व डॉ. पिच्युमोनी यांनी समाधान व्यक्त केले. लेटेस्ट मेडिकल जर्नलमधील प्रसिद्ध झालेले संशोधननिबंध कसे वाचावेत व आपलेही संशोधननिबंध आंतरराष्ट्रीय दर्जाचे कसे होतील याबद्दल मार्गदर्शन मिळाले. तीन पदव्युत्तर विद्यार्थांना आंतरदेशीय कॉन्फरन्स 'ASICON २०२२' मध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्याचबरोबर एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी आणि इन्टर्न्ससाठी Basic surgical skills ही कार्यशाळाही उत्तमरीत्या संपन्न झाली. यामुळे आपल्या शल्यकौशल्याचा दर्जा सुधारेल असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांनी प्रकट केला आणि आयोजकांचे आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०